# वनपरिक्षेत्र अधिकारी चिचपल्ली, यांचे कार्यालय

मुल रोड पोस्ट-चिचपल्ली, ता.+ जिल्हा-चंद्रपुर

दुरध्वनी क्र. 07172-232225 e-mail : rfochichpalli@yahoo.in


विषय :- "बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली "स्थापना करण्याकरिता ग्रामपंचायतीचे मंजुरीचे ठराव मिळण्याबाबत.

क्रमांक : वपअ/चिचपल्ली/2014-15/1004
चिचपल्ली,दिनांक :- 23.03.2015

प्रति,
सचिव/सरपंच,
ग्रामपंचायत चिचपल्ली

संदर्भ :- शासन निणर्य क्रमांक इ.एस.टी.2013/प्र.क्र.64/भाग-2/फ-9, मंत्रालय मुंबई दिनांक 4 डिसेंबर/ 2014

आपणास सविनय सादर करण्यांत येते कि वरील संदर्भीय शासन निर्णय प्रमाणे मौजा चिचपल्ली ता.जि.चंद्रपुर येथे बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करिता मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मौजा चिचपल्ली येथील सर्व्हे क्र.6 मधील 14.52 हे. पैकी 5.00 हे. क्षेत्रावर सदर बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली बांधण्यात येणार आहे. त्याकरिता आपल्या ग्रामपचांयतीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

करिता आपण ग्रामसभेत खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते मंजुर करुण, ठरावाची प्रत, उपस्थितांची हजेरीची प्रत लवकरात लवकर देण्यांस विनंती करण्यांत येत आहे.

## ग्रामपंचायत ठरावाचा नमुना

"चिचपल्ली ग्रामपंचायत अंतर्गत मौजा चिचपल्ली येथील सर्व्हे क्र.6 मधील 14.52 हे. पैकी 5.00 हे. क्षेत्रावर शासन निर्णय क्र. इ.एस.टी.2013/प्र.क्र.64/भाग-2/फ-9, मंत्रालय मुंबई दिनांक 4 डिसेंबर/ 2014 प्रमाणे बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली स्थापना करण्याची मान्यता प्राप्त झालेली असुन त्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही. तसेच अनुसूचित जमाती व ईतर पांरपारिक वन निवासी ( वनहक्काची मान्यता अधिनियम 2006 ची कलम 3(1),(2) व (9) तसेच कलम 4(5) च्या अंतर्गत मुळचे आदिवासी गट आणि पुर्वी पासुन शेती व्यवसायाशी संबधीत समुह यांचे हक्क सुरक्षित केलेले असुन कोणत्याही प्रकारचे हक्क सदर जमिनीवर स्थापीत केलेले नाही. करिता ग्रामपंचायत बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली स्थापना करण्याकरिता सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे."

वनपरिक्षेत्र अधिकारी